# महसूल सेवक (कोतवाल) भरती प्रक्रिया २०२६

## तहसिलदार कार्यालय देवगड, कणकवली व वैभववाडी यांचे आस्थापनेवरील कोतवाल भरतीसाठी जाहीरनामा

1. शासन, महसूल व वन विभाग, ठराव क्रमांक पी.के.ए./ १०५९ ल- ६ दिनांक ७ मे १९५९
2. शासन महसूल व वन विभाग निर्णय क्र. कोपआ ३७०५/प्र.क्र. १०६/ ई-१०, दि. २३.०१.२००८
3. शासन महसूल व वन विभाग निर्णय क्र. केओटी - २०१२/प्र क्र ४३२ /ई-१०, दि. ०५.०९.२०१३.
4. शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र. बीसीसी - २०२१/प्र क्र ३८७ /१६ब (ए), दि. ०६.०७.२०२१
5. शासन महसूल व वन विभाग निर्णय क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क्र.१९१/ ई-१०, दिनांक ०६.०४.२०२३
6. शासन महसूल व वन विभाग निर्णय क्र. संकीर्ण-२०२३/प्र.क्र.१७/ ई-१०, दिनांक १७.०५.२०२३
7. शासन महसूल व वन विभाग निर्णय क्र. संकीर्ण-२०२४/प्र.क्र.२९२/ ई-१०, दिनांक ०७.१०.२०२४
8. शासन महसूल व वन विभाग निर्णय क्र. संकीर्ण-२०२४/प्र.क्र.४१२/ ई-१०, दिनांक १४.१०.२०२४
9. शासन महसूल व वन विभाग निर्णय क्र. कोतवा-२०२३/प्र.क्र.१०२/ ई-१०, दिनांक ०२.०६.२०२५
10. कार्यासन अधिकारी, महाराष्ट शासन, महसूल व वन विभाग यांजकडील पत्र क्र.पदभ-२०२५/प्र.क्र. 98/आस्था - १० दिनांक १९.०८.२०२६, दि. ०३.०९.२०२६, व दि. ०१.१०.२०२६
11. मा. जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग यांजकडील पत्र क्र. कुवशा/डेस्क-३/महसूल सेवक/पदभरती/२०२६ दिनांक २४.०८.२०२६
12. तहसिलदार कणकवली यांचेकडील निवड समिती गठीत आदेश क्र. आस्था/कोत.भ/निवड समिती/२०२६ दिनांक २३.०९.२०२६
13. तहसिलदार देवगड यांचेकडील निवड समिती गठीत आदेश क्र. आस्था-२/म.से./समिती/०९/२०२६ दिनांक १२.०९.२०२६
14. तहसिलदार वैभववाडी यांचेकडील निवड समिती गठीत आदेश क्र. आस्था/कोत.भ/निवड समिती/ २०२६ दिनांक १७.०९.२०२६

सर्व नागरीकांना याद्वारे जाहिर करण्यात येते की, उपरोक्त शासन निर्णयातील व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशांच्या व तरतुदींच्या अनुषंगाने तहसिलदार देवगड, कणकवली वैभववाडी यांचे आस्थापनेवरील खालील ग्राम महसूल अधिकारी साझामधील महसूल सेवक (कोतवाल) रिक्त पदे भरण्यात येणार आहेत. त्यासाठी इच्छुक उमेदवारांकडून या जाहीरनाम्याद्वारे **दि. 02.10.2026 ते दि. 17.10.2026 पर्यंत शासकीय सुट्टीचे दिवस वगळून सकाळी 09.45 ते सायंकाळी 06.15 वाजेपर्यंत** अर्ज मागविण्यात येत आहेत. तहसिलदार कार्यालय देवगड, कणकवली, व वैभववाडी या तालुक्यातील महसूल सेवक (कोतवाल) रिक्त पदे भरण्यासाठीचा अनुशेष खालीलप्रमाणे आहे.

### तालुका - देवगड

| पदाचे नाव व मानधन | एकूण भरावयाची कोतवालांची पदे | | समांतर आरक्षण महिला | समांतर आरक्षण विरहीत | साझाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| | संख्या | प्रवर्ग | | | |
| महसूल सेवक (कोतवाल) रु. १५०००/- (दरमहा) | 1 | अनुसूचित जाती | | 1 | गवाणे, किंजवडे, बापर्डे, धालवली |
| | 1 | अनुसूचित जमाती | 1 | | |
| | 1 | अराखीव | | 1 | |
| | 1 | अराखीव | | 1 | |
| **एकूण** | **04** | **-** | **1** | **3** | |

s/d.

### तालुका - कणकवली

| पदाचे नाव व मानधन | एकूण भरावयाची कोतवालांची पदे | | समांतर आरक्षण महिला | समांतर आरक्षण विरहीत | साझाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| | संख्या | प्रवर्ग | | | |
| महसूल सेवक (कोतवाल) रु. १५०००/- (दरमहा) | 1 | अनुसूचित जमाती | | 1 | ओसरगाव, शिरवल, वरवडे, हरकुळ बु., सांगवे, कोळोशी, करंजे, कणकवली |
| | 1 | भटक्या जमाती (ब) | 1 | | |
| | 1 | भटक्या जमाती (ड) | | 1 | |
| | 1 | इतर मागासवर्ग | | 1 | |
| | 1 | सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (SEBC) | | 1 | |
| | 1 | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS) | 1 | | |
| | 2 | अराखीव | | 2 | |
| **एकूण** | **08** | **-** | **2** | **6** | |

### तालुका - वैभववाडी

| पदाचे नाव व मानधन | एकूण भरावयाची कोतवालांची पदे | | समांतर आरक्षण महिला | समांतर आरक्षण विरहीत | साझाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| | संख्या | प्रवर्ग | | | |
| महसूल सेवक (कोतवाल) रु. १५०००/- (दरमहा) | 1 | भटक्या जमाती -ड | - | 1 | कुर्ली, कुसुर, तिरवडे तर्फ सौंदळ |
| | 1 | विशेष मागास प्रवर्ग | 1 | - | |
| | 1 | सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (SEBC) | - | 1 | |
| **एकूण** | **03** | **-** | **1** | **2** | |

वरीलप्रमाणे रिक्त सजातील महसूल सेवक (कोतवाल) भरती करणेची असून इच्छुक उमेदवारांकडून अध्यक्ष, महसूल सेवक (कोतवाल) निवड समिती तथा उपविभागीय अधिकारी कणकवली यांचेमार्फत हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासून **दि. 17.10.2026 पर्यंत शासकीय सुट्टीचे दिवस वगळून सकाळी 09.45 ते सायंकाळी 06.15 वाजेपर्यंत** अर्ज मागविणेत येत आहेत. सदर तारखेनंतर येणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी. **दिनांक 17.10.2026 हा शासकीय सुट्टीचा दिवस असला तरी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस असलेने, त्या दिवशी विशेष व्यवस्था म्हणून अर्ज स्वीकारणेत येतील.** याबाबत दि. **17 ऑक्टोबर, 2026** पर्यंत प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करून पात्र उमेदवारांची यादी दिनांक **02 नोव्हेंबर, 2026** रोजी संबंधित तहसीलदार कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध करणेत येईल. पात्र उमेदवारांचे लेखी परिक्षेचे ठिकाण उमेदवाराच्या प्रवेशपत्रावर नमूद असेल. तसेच या जाहीरनामाच्या प्रसिध्दीपूर्वी केलेल्या कोणत्याही अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

प्रस्ताविकेतील अ.क्र. 1 व 9 नुसार महसूल सेवकांच्या (कोतवाल) नेमणूका व नोकरी बाबतच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे असून उमेदवारांना बंधनकारक राहतील.

**महसूल सेवक (कोतवाल) पदासाठी इच्छुक उमेदवार हे खाली नमुद केलेल्या अटी व शर्तीस पात्र असणे आवश्यक आहेत.**

1. शैक्षणिक पात्रता किमान 4 थी उत्तीर्ण
2. अर्जदाराचे वय जाहिरनाम्याच्या दिनांकास 18 वर्षापेक्षा कमी व 40 वर्षापेक्षा जास्त नसावे. पुराव्यादाखल जन्म प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचा दाखला यापैकी एक पुरावा जोडणे आवश्यक आहे. याव्यतिरीक्त इतर कुठलाही पुरावा ग्राहय धरला जाणार नाही. संबंधित पुरावा स्वसांक्षांकित असावा. तसेच स्वयंघोषणापत्र संलग्न करावे.
3. अर्जदार हा शारीरीकदृष्टया व कोतवाल पदाची कर्तव्ये पार पाडण्यास सक्षम असला पाहिजे. नियुक्तीनंतर सहा महिन्यात जिल्हा शल्य चिकीत्सक यांचे याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणेची जबाबदारी उमेदवाराची राहील. सदर प्रमाणपत्र सहा महिन्यात सादर न केल्यास सदरची निवड रद्द करणेत येईल.
4. अर्जदार ज्या सजासाठी अर्ज करीत आहे तो त्याच तालुक्याचा स्थानिक रहिवासी असावा व तालुक्याची अर्जदारास माहिती असणे आवश्यक आहे. उमेदवाराने स्थानिक रहिवासी असल्याबाबतचे तहसिलदार यांचा स्थानिक वास्तव्याचा/रहिवाशी दाखला जोडणे आवश्यक आहे. याव्यतिरीक्त इतर कुठलेही पुरावे ग्राहय धरले जाणार नाहीत. सदर पुरावा स्वसांक्षाकित असावा.
5. अर्जदार यांना विहित नमुन्यातील अर्ज संबंधित तहसीलदार कार्यालयातुन उपलब्ध करुन घेता येईल. अर्जदार ज्या तालुक्याचा स्थानिक रहिवासी आहे, त्याच तालुक्यातील रिक्त कोतवाल पदासाठी अर्ज करता येईल. तसेच सदर अर्ज हा त्याच तहसिलदार कार्यालयात स्वत: उपस्थित राहुन सादर करावा. पोस्टाव्दारे अथवा इतर इलेक्ट्रॉनिक माध्यम उदा. इमेल इ. व्दारे आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. त्याचप्रमाणे तहसिलदार कार्यालयाकडुन उपलब्ध करुन दिलेले विहीत नमुन्यातील मुळ अर्जच स्वीकारले जातील. अर्जाची झेरॉक्स स्वीकारली जाणार नाही.
6. राखीव प्रवर्गासाठी अर्ज करणा-या अर्जदाराने सक्षम प्राधिका-याचे जातीचे प्रमाणपत्राची स्वसाक्षांकित प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. जातीचे प्रमाणपत्र (संबधित जात आरक्षणासाठी), उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे अर्जाचे अंतिम दिनांकास वैध असलेले व संबधित प्रवर्गास लागू असलेले शासन निर्देशांनुसार आवश्यक नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (ज्या प्रवर्गाला लागू आहे), आर्थिकदृष्टया दुर्बल घटक प्रमाणपत्र (फक्त EWS दावा करणा-यासाठी) अर्जासोबत न जोडल्यास अर्ज अपात्र ठरविणेत येईल. तसेच उमेदवाराची नियुक्ती झाल्यास नियुक्ती दिनांकापासुन 6 महिन्याचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. विहित कालावधीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता, कोणतेही कारण न देता नियुक्ती रद्द/समाप्त करणेत येईल.
7. महिला समांतर आरक्षणांतर्गत अर्ज करणा-या उमेदवारांकरीता महिला व बाल विकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र.महिआ 2023/प्र.क्र.123/कार्या-2 दि. 04.05.2023 चे शासन निर्णयानुसार खुल्या प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीकरीता खुल्या प्रवर्गातील महिला तसेच सर्व मागास प्रवर्गातील महिला उमेदवारांना नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची अट रद्द करणेत आली आहे. सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र. 4 नुसार अनुसुचित जाती व अनुसुचित जमाती वगळता अन्य मागास प्रवर्गातील महिलांकरीता आरक्षित असलेल्या पदावरील निवडीसाठी दावा करु इच्छिणा-या महिलांना त्या त्या मागास प्रवर्गासाठी इतर मागास व बहुजन कल्याण विभाग तसेच सामान्य प्रशासन विभागाकडुन वेळोवेळी विहीत करण्यात आल्याप्रमाणे नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.
8. अ.जा. व अ.ज. प्रवर्गातील उमेदवार वगळता अन्य मागास प्रवर्गातील सर्व स्त्री/पुरुष उमेदवारांनी ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे अर्जाचे अंतिम दिनांकास वैध असलेले व संबधित प्रवर्गास लागू असलेले शासन निर्देशांनुसार आवश्यक नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र अर्जासोबत सादर करणे बंधनकारक आहे.

s/w.

9. शासन सामान्य प्रशासन विभाग, महिला व बाल विकास विभाग व शालेय शिक्षण व क्रिडा विभाग यांचेकडील निर्णय दि. 16/04/1981, 27/10/2009, 19/09/2013, 01/07/2016, 21/01/1980, 27/08/2009, 04/11/2016, 02/05/1998, 28/07/2014 व 02/04/2018 अन्वये समांतर आरक्षण हे वर्ग अ ते ड या गटातील पदांसाठी लागु असलेने व महसुल व वन विभागातील कोतवाल हे पद अवर्गीकृत असलेने शासन निर्देशांनुसार महिला समांतर आरक्षण लागू राहील. तथापि, अपंग प्रकल्पग्रस्त व भुकंपग्रस्त, अंशकालीन, खेळाडु, माजी सैनिक इ. साठी देण्यात आलेली वयोमर्यादेतील शिथिलता व आरक्षण कोतवाल भरतीसाठी लागु असणार नाही.

10. अर्जदार व्यक्तीस कोणत्याही गुन्हयात कोणत्याही प्रकारचा दंड अगर शिक्षा झालेली नसावी. त्याबाबतचे स्वयंघोषणापत्र अर्जदाराने अर्जासोबत सादर करणे आवश्यक आहे. तसेच नियुक्तीनंतर एक महिन्यात संबंधित पोलीस स्टेशनचे चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

11. अर्ज पुर्ण माहितीसह व अचुक भरावा. ज्या ग्राम महसूल अधिकारी साझासाठी अर्ज केला आहे त्या साझाचे नाव, प्रवर्ग भरणे अत्यावश्यक आहे. अर्जदारास एकाच सजासाठी अर्ज सादर करता येईल. एकापेक्षा जास्त साझांठी अर्ज सादर केल्यास प्रथम प्राप्त अर्जाचाच विचार करणेत येईल. अर्जात नमुद केलेली माहिती खोटी/चुकीची/दिशाभुल करणारी आढळल्यास उमेदवाराची निवड रद्द करणेत येईल व गुणवत्तेनुसार पुढील उमेदवारास संधी देणेत येईल.

12. अर्जदार व्यक्तीस वर नमुद केलेल्या पात्रतेसह लेखी परिक्षेत गुणवत्ता प्राप्त करावी लागेल. लेखी परिक्षेच्या गुणांचे आधारे सजानिहाय गुणानुक्रमे निवडसुची तयार करुन निवडसुचीतील पात्र उमेदवारांची गुणवत्तेनुसार अंतिम निवड यादी तयार करण्यात येईल.

13. अर्जासोबत कुठल्याही राजकीय पक्षाची शिफारस जोडलेली नसावी. अन्यथा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.

14. अपुर्ण माहितीचे, विहीत नमुन्यात व कालावधीत प्राप्त न झालेले, विहीत शुल्क भरणा न केलेले, शैक्षणिक अर्हता न धारण केलेले, वयाची अट पुर्तता न केलेले, फोटो नसलेले, मुदतबाहय प्राप्त अर्ज रद्द करण्यात येतील. याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

15. ज्या उमेदवारांचे अर्ज पात्र ठरतील अशा उमेदवारांची नावे व परिक्षेचे ठिकाण संबंधित तहसिलदार कार्यालय देवगड, कणकवली वैभववाडी येथील नोटीसबोर्डावर प्रसिध्द करणेत येईल. परिक्षेसाठीचे प्रवेशपत्र संबंधित तहसिल कार्यालयाकडुन वेळेत प्राप्त करुन घेण्याची जबाबदारी पुर्णत: उमेदवाराची राहील. पात्र उमेदवारांची लेखी परिक्षा **रविवार 15/11/2026 रोजी सकाळी 11.00 ते 12.00** या वेळेत उमेदवाराचे प्रवेशपत्रावर नमुद असलेल्या ठिकाणी घेण्यात येईल. लेखी परिक्षेस उमेदवाराने परिक्षा सुरु होण्यापुर्वी एक तास अगोदर परिक्षा केंद्रावर उपस्थित राहणे आवश्यक आहे. तसेच लेखी परिक्षेकरीता स्वखर्चाने उपस्थित राहणेची जबाबदारी उमेदवाराची राहील.

16. नियुक्तीचे वेळी अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रांचे मुळ प्रती सादर करणे उमेदवारास बंधनकारक राहील.

17. कोतवाल पदाच्या अर्जाचे शुल्क रु 50/- रोखीने भरुन अर्ज प्राप्त करुन घेता येईल. परिक्षा शुल्क मागासवर्गीय उमेदवारांकरीता रु 200 व इतर उमेदवारांकरीता रु. 300/- इतके असेल. सदर परिक्षा शुल्क नापरतावा आहे.

18. कागदपत्रांसहीत अर्ज सादर करताना अर्जावर रक्कम रु 5/- कोर्ट फी स्टॅम्प चिकटविणे व परिक्षा शुल्क रोखीने भरणे आवश्यक आहे. धनादेश, डिमांड ड्राफ्ट स्वीकारले जाणार नाहीत.

**<u>सेवाशर्ती</u>**

1. महसूल सेवक (कोतवाल) हे पद अवर्गीकृत पद असुन शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार मानधन देय राहील. तसेच त्यांना सेवानिवृत्ती विषयक लाभ अनुज्ञेय नाहीत.
2. महसूल सेवकांची (कोतवाल) नेमणुक ही पुर्णत: मानधन तत्वावर असुन सदर नेमणुक ही पुर्णत: अस्थायी व तात्पुरत्या स्वरुपाची राहील.

3. महसूल सेवक (कोतवाल) हा पुर्ण वेळ शासनाचा सेवक असेल.

**<u>अर्जदाराने अर्जासोबत सादर करावयाचे कागदपत्र</u>**

1. शैक्षणिक पात्रतेच्या पुराव्याची सत्यप्रत उदा. किमान 4 थी पास गुणपत्रक/प्रमाणपत्र किंवा त्यावरील परिक्षा पास गुणपत्रक/प्रमाणपत्र
2. उपरोक्त अटी व शर्तीमधील अ.क्र. 2 मध्ये नमुद केलेप्रमाणे वयाच्या पुराव्याची स्वसांक्षाकित प्रत
3. उपरोक्त अटी व शर्तीमधील अ.क्र. 4 मध्ये नमुद केलेप्रमाणे उमेदवार संबंधित तालुक्याचा रहिवाशी असल्याबाबतच्या पुराव्याची स्वसांक्षाकित प्रत
4. राखीव प्रवर्गाकरीता जात प्रमाणपत्र, लागु असल्यास नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची स्वसाक्षांकित प्रत
5. उमेदवाराचे अर्जासोबत अलिकडचे काळातील काढणेत आलेले पासपोर्ट आकाराचे दोन रंगीत फोटो पैकी एक फोटो अर्जावर योग्य ठिकाणी चिकटवुन त्यावर उमेदवाराने स्वाक्षरी करावी.
6. शासन निर्णय महसूल व वन विभाग क्र. कोतवा-2023/प्र.क्र.102/ई-10 दिनांक 02 जून, 2025 अन्वये लहान कुटुंबाबतचे नमुना "अ" मधील प्रमाणपत्र
7. विवाहित महिला उमेदवार असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र /नाव बदलाबाबतचे गॅझेट प्रत
8. चौथी उत्तीर्ण झाल्यानंतर कोणत्याही कारणास्तव उमेदवाराचे नावात कोणताही बदल झाला असल्यास त्याबाबत शासन राजपत्राची प्रत
9. परिक्षा शुल्क भरणा केलेल्या पावतीची प्रत

**<u>अर्ज वितरणाचे ठिकाण</u>**

महसूल सेवक (कोतवाल) पदासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना **दि. 02/10/2026 पासुन ते दि. 17/10/2026** पर्यंत शासकिय सुट्टी वगळुन कार्यालयीन कामाकाजाचे वेळेत संबंधित तहसिलदार कार्यालयामधुन अर्ज शुल्क रु 50/- भरणा करुन प्राप्त करुन घेता येतील. तसेच परिपुर्ण कागदपत्रासहीत अर्ज **दि. 17/10/2026 रोजी सायंकाळी 06.15** वाजेपर्यंतच स्वीकारले जातील. **दिनांक 17.10.2026 हा शासकीय सुट्टीचा दिवस असला तरी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस असलेने, त्या दिवशी विशेष व्यवस्था म्हणून अर्ज स्वीकारणेत येतील.**

**<u>कामकाजाचे स्वरुप</u>**

1. तलाठी सजा व कार्यालयीन आवारातील स्वच्छता, साफसफाई करणे
2. तलाठी सजाशी संबंधित सर्व कामाकाजात तलाठी यांना सहाय्य करणे
3. कार्यालयीन दप्तर वाहुन नेणे
4. कार्यालयीन टपालाची ने-आण करणे, नोटीस बजावणे, दवंडी पिटवणे
5. सरकारी मालमत्तेचे संरक्षण करणे
6. कोतवाल भरती व नेमणुक नियम 1959 मध्ये नमुद केलेली सर्व कामे
7. या व्यतिरीक्त वेळोवेळी वरिष्ठ अधिका-यांनी सोपविलेली इतर सर्व कामे पार पाडावी लागतील.

**<u>परिक्षेचे स्वरुप</u>**

1. महसूल सेवक (कोतवाल) पदासाठी घेण्यात येणारी परिक्षा ही वस्तुनिष्ठ, बहुपर्यायी स्वरुपाचे 50 प्रश्न व 100 गुणांची सामान्य ज्ञान, बौध्दीक चाचणी, मराठी, गणित, विज्ञान, इतिहास व नागरीकशास्त्र, सिंधुदुर्ग जिल्हा माहिती यावर आधारीत प्रश्नांची राहील व परिक्षेचे माध्यम मराठी राहील.
2. लेखी परीक्षा ही **दि. 15/11/2026 रोजी सकाळी 11.00 ते 12.00** या वेळेत उमेदवाराचे प्रवेशपत्रावर नमुद असलेल्या केंद्रावर घेण्यात येईल.
3. परिक्षेस येताना परिक्षा कक्षामध्ये सोबत परिक्षा प्रवेशपत्र व स्वत:चे फोटो ओळखपत्र (आधार, पॅन, ड्रायव्हींग लायसन्स, निवडणुक ओळखपत्र यापैकी एक) ठेवणे बंधनकारक आहे.

S/-

4. कोणत्याही कारणास्तव परिक्षा स्थगित ठेवावी लागल्यास पुढील परिक्षेची वेळ, ठिकाण व दिनांक उमेदवारास त्याने अर्जात नमुद केलेल्या मोबाईल क्र. ई मेलव्दारे कळविणेत येईल. तशा सुचना संबंधित तहसिलदार कार्यालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेत येतील. अशा वेळी प्रथम परिक्षेचे प्रवेशपत्र ग्राहय धरण्यात येईल.
5. परिक्षेला परिक्षा कक्षामध्ये कोणतेही पुस्तकी साहीत्य, कॅलक्युलेटर, मोबाईल, स्मार्ट वॉच, इअर फोन इ. इलेक्ट्रॉनिक गॅझेट सोबत बाळगता येणार नाही. असे साहीत्य आढळुन आल्यास संबंधित उमेदवारास तात्काळ भरती प्रक्रियेपासुन अपात्र ठरविणेत येईल.
6. कोतवाल पदासाठी घेण्यात येणा-या 100 गुणांचे लेखी परिक्षेमध्ये उत्तीर्ण होण्याकरीता किमान 40 गुण मिळविणे उमेदवारांना बंधनकारक राहील.
7. या भरती प्रक्रियेतील परीक्षेत **ऋण गुणांकन (Negative Marking) असणार नाही**.

**OMR शीट (उत्तरपत्रिके) बाबत सुचना** -

1. उत्तरपत्रिका काळजीपुर्वक हाताळावी, ती चुरगळणार नाही, फाटणार नाही, खराब होणार नाही, त्यावर कोणतीही खाडाखोड होणार नाही याची उमेदवाराने दक्षता घ्यावी.
2. लेखी परीक्षा घेतेवेळी उत्तरपत्रिकेची OMR शीट प्रमाणे तपासणी होणार असल्याने उत्तरे लिहीण्यासाठी अथवा योग्य पर्यायावर भरीव वर्तुळाने चिन्हांकित करण्यासाठी **फक्त काळया शाईचे बॉल पेन** वापरावे.
3. उत्तरपत्रिकेच्या OMR शीटवर विहीत ठिकाणी परिक्षेचे नाव, प्रश्नपत्रिका संच क्रमांक, बैठक क्रमांक, प्रश्नपत्रिका क्रमांक योग्य ठिकाणी व अचुकपणे नमुद करुन विहीत ठिकाणी स्वाक्षरी करावी.

**सामाजिक आरक्षण**

1. रिक्त पदांची संख्या, आरक्षण, अनुशेष यात बदल होण्याची शक्यता आहे. महिलांसाठी विहीत केलेले आरक्षण नियमानुसार अनुज्ञेय असेल.
2. महिलांसाठी 30% प्रमाणे आरक्षित पदे महिला व बालविकास विभाग यांचेकडील दि. 25.05.2001 च्या शासन निर्णयानुसार भरण्यात येतील. तथापी एखादया प्रवर्गात महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर पदे त्या प्रवर्गाच्या पुरुष उमेदवारांमधुन भरण्यात येतील.
3. वि.जा.(अ.), भ.ज. (ब.), भ.ज.(क.) व भ.ज.(ड.) या प्रवर्गासाठी आरक्षित असलेली पदे आंतरपरिवर्तनीय असुन आरक्षित पदासाठी संबंधित प्रवर्गातील पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास अदययावत शासन धोरणाप्रमाणे उपलब्ध प्रवर्गातील उमेदवाराचा विचार गुणवत्तेच्या आधारे करणेत येईल. आंतरपरिवर्तनाची अट सक्षम मंजूरी व लागू शासन धोरणांचे अधीन राहील.
4. इतर राज्यातुन महाराष्ट्र राज्यात स्थलांतरीत झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांचा आरक्षित पदाकरीता विचार केला जाणार नाही.
5. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील उमेदवारांकरीता सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील शासन निर्णय दि. 12.02.2019 व दि. 31.05.2021 अन्वये विहीत करण्यात आलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**महसूल सेवक (कोतवाल) भरतीबाबत वेळापत्रक**

| अ.क्र. | कामाचे स्वरूप | दिनांक व वार | ठिकाण |
|---|---|---|---|
| १. | वर्तमानपत्र जाहीरात/ जाहीरनामा प्रसिध्द करणे | शुक्रवार 02/10/2026 ते शनिवार 17/10/2026 | तहसिलदार कार्यालय देवगड. कणकवली व वैभववाडी यांचे नोटीस बोर्डावर |
| २. | अर्ज विक्री व स्विकारणे (सार्वजनिक सुट्टी वगळून कार्यालयीन कामकाजाचे दिवशी सकाळी 09.45 ते सायं. 6.15 पर्यंत यावेळेत) | शुक्रवार 02/10/2026 ते शनिवार 17/10/2026 | तहसिलदार कार्यालय देवगड. कणकवली व वैभववाडी यांचे नोटीस बोर्डावर |

s/d

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | अर्जाची छाननी करून परिक्षेसाठी पात्र, अपात्र उमेदवारांची यादी प्रसिद्ध करणे | सोमवार 02/11/2026 | तहसिलदार कार्यालय देवगड. कणकवली व वैभववाडी यांचे नोटीस बोर्डावर |
| ४. | परिक्षा प्रवेशपत्र प्राप्त करून घेणे | बुधववार 04/11/2026 ते मंगळवार 10/11/2026 | तहसिलदार कार्यालय देवगड. कणकवली व वैभववाडी यांचे नोटीस बोर्डावर |
| ५. | लेखी परीक्षा | रविवार 15/11/2026 (वेळ सकाळी 11.00 ते दुपारी 12.00) | प्रवेशपत्रावर नमूद करण्यात येईल. |
| ६. | सझानिहाय व गुणवत्तानिहाय लेखी परीक्षेत पात्र उमेदवारांची यादी तयार करून अंतिम निवड यादी व प्रतिक्षायादी प्रसिध्द करणे | सोमवार 16/11/2026 | तहसिलदार कार्यालय देवगड. कणकवली व वैभववाडी यांचे नोटीस बोर्डावर |
| ७. | निवड झालेल्या उमेदवारांचे मुळ कागदपत्रांची तपासणी | मंगळवार 17/11/2026 ते शुक्रवार 27/11/2026 | तहसिलदार कार्यालय देवगड. कणकवली व वैभववाडी |
| ८. | नियुक्ती आदेश निर्गमित करणे | शनिवार 28/11/2026 | तहसिलदार कार्यालय देवगड. कणकवली व वैभववाडी |

**<u>सर्वसाधारण सूचना</u>**

१. उमेदवाराने अर्ज केला अथवा विहीत अर्हता धारण केली म्हणजे लेखी परिक्षेस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही.

२. रिक्त पदांचे संख्येत वाढ अथवा घट होण्याची शक्यता आहे.

३. उमेदवार निवडीची पद्धत तालुकास्तरीय निवड करून सजा वाटप अशी राहणार आहे.

४. समांतर आरक्षण विरहित पदावर महिला उमेदवारानाही गुणवत्तेनुसार निवड मिळु शकते.

५. शासन निर्देशांनुसार प्रतिक्षायादी तिची वैधता आणि वापराची मर्यादा असेल.

६. समान गुण मिळाल्यास शासन निर्देशांनुसार प्राधान्यक्रम निश्चित केला जाईल.

७. सदर जाहिरात व जाहिरातीमध्ये / वेळापत्रकामध्ये / निवड प्रक्रियेमध्ये काहीही बदल झाल्यास त्याबाबतची माहिती तहसिलदार कार्यालय देवगड, कणकवली व वैभववाडी यांचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द करणेत येईल.

८. भरती प्रक्रियेबाबतचे सर्व अधिकार अध्यक्ष, कोतवाल निवड समिती तथा उपविभागीय अधिकारी कणकवली यांजकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत.

S/- 2/10/26

अध्यक्ष,
महसूल सेवक (कोतवाल) निवड समिती
तथा उपविभागीय अधिकारी कणकवली

क्र. कुळवहिवाट/म.से.भ./जाहिरात/१०/२०२६
उपविभागीय अधिकारी कार्यालय, कणकवली
दिनांक - ०२.१०.२०२६

प्रत -
1. मा. जिल्हाधिकारी सिंधुदुर्ग (कुळवहीवाट शाखा) यांजकडे माहितीसाठी सविनय सादर
2. सदस्य सचिव, महसूल सेवक (कोतवाल) निवड समिती तथा तहसिलदार कार्यालय देवगड. कणकवली व वैभववाडी यांना माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी तसेच नोटीसबोर्डावर प्रसिध्दीसाठी व रिक्त असलेल्या कोतवाल पदाचे तलाठी सजाचे ठिकाणी व संबंधित गावात पुरेशी प्रसिध्दी देणेसाठी जाहिरनामा प्रसिध्द करुन अहवाल सादर करणेसाठी रवाना.

S/- 2/10/26

अध्यक्ष,
महसूल सेवक (कोतवाल) निवड समिती
तथा उपविभागीय अधिकारी कणकवली